**निशाणी क्र.८८**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – संतोष गुरुलिंग/गुरुनाथअप्पा स्वामी,

वय – ४६ वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – रा.बडूर, ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर कुलकर्णी. यांचे मार्फत सुरुः–**

१. मी आरोपी क्र. १ व २ यांना ओळखत नाही. घटनेला किती वर्षे झाली मला काहीच माहिती नाही. त्या दिवशी काय झाले काहीही माहिती नाही. असे काहीही घडले नाही की, आरोपी विजयकुमार बाबु माने व विष्णू विठ्ठल सारगे हे दोघे दोन नायलॉनच्या पोत्यामध्ये शेतक–याने शेतामध्ये जोपासलेल्या चंदनाच्या झाडाची तोडफोड करुन झाडाचा गाभा व लाकडे घेऊन मोटार सायकलवर चोरुन जात होते व तिथे त्यांना पकडणारे लातूर येथील पोलीस असल्याचे समजले. त्यावेळी पोलीसांनी मोटार सायकल क्रमांक एमएच २४ एडी ३२३८ वर दोन चंदनाचे गाठोडे अंदाजे चाळीस किलो चंदन ताब्यात घेऊन जाणा–या लोकांना पोलीसांनी ताब्यात घेतले.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.११.२०१६ रोजी रोजच्याप्रमाणे रात्री १० वाजता माझा धाबा बंद करुन झोपलो होतो. साक्षीदारास अधोरेखीत भाग वाचून

दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अधोरेखीत भाग अ प्रमाणे घटना घडलेली आहे. पोलीसांनी माझ्या जबाबात तसे का लिहीले त्याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. पी.सी.भोसले यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.21 17:33:56 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–२१/०४/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

निलंगा